राज्य मुख्य साधन संस्थांच्या (KRC) कार्यान्वयनासाठी आदिवासी विकास विभागांतर्गत आदिवासी वाड्या-वस्त्या-पाडे व सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागांतर्गत दलित वस्तीतील शाळा,अंगणवाडी वसतिगृह क्षेत्रात पाणी व स्वच्छता (WASH) सुविधां संदर्भात मार्गदर्शक सूचना

महाराष्ट्र शासन

पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग

शासन परिपत्रक क्रमांकः क्रमांक केआरसी- २०१६/प्र.क्र.१६/पापु-०८

७ वा मजला, गोकुळदास तेजपाल रुग्णालय संकुल इमारत

लोकमान्य टिळक मार्ग, क्राफर्ड मार्केट,मंत्रालय,मुंबई- ४०० ००१

तारीख: १३ जानेवारी,२०१६

वाचा:-

१) पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग,शासन निर्णय क्रमांकः केआरसी-३६१४/प्र.क्र.१२/पापु-०८ दिनांक १ सप्टेंबर २०१४,

२) पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग शासन परिपत्रक क्रमांकः केआरसी-३६१४/प्र.क्र.१२/पापु-०८ दिनांक १५ डिसेंबर,२०१४,

३) शासन परिपत्रक क्रमांकः केआरसी ३६१५/प्र.क्र.०४/पापु-०८ दिनांक १७ जानेवारी २०१५, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग

४) दि.०२ नोव्हेंबर,२०१५ रोजी आदिवासी विकास विभाग व युनिसेफ यांच्यासमवेत झालेली बैठक.

प्रस्तावना:-

पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाने वाचा मधील शासन निर्णय क्र.१ व शासन परिपत्रक क्र.२ अन्वये ग्रामीण पाणी पुरवठा व स्वच्छता कार्यक्रमासाठी मुख्य साधन संस्थांची निवड केलेली आहे. याद्वारे निर्मल भारत अभियान,(आता स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण)), राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम, जलस्वराज्य कार्यक्रम-२ इत्यादी महत्वाच्या कार्यक्रमांच्या अंमलबजावणीमध्ये विभागाला मदत करण्यासाठी विविध विषयांच्या अनुषंगाने मुख्य साधन संस्थांचा जिल्हा आणि राज्यस्तरावर सहभाग घेण्यासाठी कशाप्रकारे काम करावे याबाबत मार्गदर्शक सूचना वाचा मधील शासन परिपत्रक क्र.३ अन्वये निर्गमित केल्या आहेत. आदिवासी विकास विभाग व युनिसेफ सोबत झालेल्या बैठकीतील चर्चेच्या अनुषंगाने विभागाकडील मुख्य साधन केंद्रांमार्फत आदिवासी विकास विभाग अंतर्गत

आदिवासी वाडया-वस्त्या -पाडयातील शाळात, आश्रमशाळांत व वसतीगृहात तसेच सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग अंतर्गत दलित वस्तीतील शाळात, आश्रमशाळांत व वसतीगृहात पाणी पुरवठा आणि स्वच्छता क्षेत्रात याआधी नेमून दिलेल्या कामांसोबतच सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करणे, कामाची प्रत्यक्ष अंमलबजावणी करणे व निर्मीत सुविधांची भविष्यातील देखभाल दुरुस्तीची कामे करण्याच्या अनुषंगाने मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधिन होती.

शासन परिपत्रक:-

वाचा मधील शासन निर्णय क्र. १ अन्वये राज्य स्तरावरील निवडण्यात आलेल्या २२ मुख्य साधन संस्थांना (KRC) आदिवासी विकास विभाग अंतर्गत आदिवासी वाडया-वस्त्या-पाडयातील शाळात, आश्रमशाळांत व वसतीगृहात तसेच सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग अंतर्गत दलित वस्तीतील शाळात, आश्रमशाळांत व वसतीगृहात त्यांचे नियमित कामासोबतच खालील कामे करण्यासाठी शासन मान्यता देण्यात येत आहे:·

१. आदिवासी विकास विभाग अंतर्गत आदिवासी वाडया-वस्त्या-पाडयातील शाळात, आश्रमशाळांत व वसतीगृहात तसेच सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग अंतर्गत दलित वस्तीतील शाळात, आश्रमशाळांत व वसतीगृहात कर्मचारी वर्ग, मुले व शाळा व्यवस्थापन समितीतील (SMCs) सदस्य यांना पाणी पुरवठा, स्वच्छता बाबत प्रशिक्षण व क्षमता बांधणी करणे·

२. आदिवासी विकास विभाग अंतर्गत आदिवासी वाडया-वस्त्या-पाडयातील शाळात, आश्रमशाळांत व वसतीगृहात तसेच सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग अंतर्गत दलित वस्तीतील शाळात, आश्रमशाळांत व वसतीगृहात माहिती, शिक्षण व संवाद (IEC) द्वारे मार्गदर्शन करणे·

३. आदिवासी विकास विभाग अंतर्गत आदिवासी वाडया-वस्त्या-पाडयातील शाळात, आश्रमशाळांत व वसतीगृहात तसेच सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग अंतर्गत दलित वस्तीतील शाळात, आश्रमशाळांत व वसतीगृहा मधील पाणी पुरवठा, स्वच्छता सुविधांबाबत सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करणे·

४. आदिवासी विकास विभाग अंतर्गत आदिवासी वाडया-वस्त्या-पाडयातील शाळात, आश्रमशाळांत व वसतीगृहात तसेच सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग अंतर्गत दलित वस्तीतील शाळात, आश्रमशाळांत व वसतीगृहात अस्तित्वात असलेल्या पाणी पुरवठा, स्वच्छता सुविधांची दुरुस्ती/सुधारणा करणे अथवा ते शक्य नसल्यास आवश्यकतेनुसार अतिरीक्त/नवीन सुविधा निर्माण करणे व या सुविधांची देखभाल दुरुस्ती करुन प्रक्रिया व तंत्रज्ञान हस्तांतरित करणे·

५. आदिवासी विकास विभाग अंतर्गत आदिवासी वाडया-वस्त्या-पाडयातील शाळात, आश्रमशाळांत व वसतीगृहात तसेच सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग अंतर्गत दलित वस्तीतील शाळात, आश्रमशाळांत व वसतीगृहात कामांबाबत सनियंत्रण व मूल्यमापन·

६. आदिवासी विकास विभाग अंतर्गत आदिवासी वाडया-वस्त्या-पाडयातील शाळात, आश्रमशाळांत व वसतीगृहात तसेच सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग अंतर्गत दलित वस्तीतील शाळात, आश्रमशाळांत व वसतीगृहात निर्माणाधीन पाणी पुरवठा व स्वच्छतेच्या सुविधांच्या देखभाल व दुरुस्तीसाठी त्रयस्थ यंत्रणा म्हणून मदत करणे

आदिवासी विकास विभाग व सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग यांचेवर याबाबत पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाने संदर्भिय शासन निर्णयान्वये अंतिम केलेल्या राज्यस्तरिय मुख्य साधन केंद्रांमधून अंतर्गत, सिमीत (Internal & Closed Bidding) पारदर्शी निवीदा प्रक्रिया पार पाडून ठरविलेल्या दराने व त्यानुसार केलेल्या करारनाम्याप्रमाणे (Terms of Reference) निवड प्रक्रिया पार पाडण्याची व त्यांना योग्य तो मोबदला अदा करण्याची संपुर्ण जवाबदारी आदिवासी विकास विभाग व सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग यांची असेल.

सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करणाऱ्या मुख्य साधन केंद्रांना त्याच ठिकाणी अंमलबजावणी यंत्रणा म्हणून काम करता येणार नाही.

कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद यांना मुख्य साधन केंद्रांनी तयार केलेल्या सविस्तर प्रकल्प अहवालास (DPR) तांत्रिक मंजूरी देण्याचे अधिकार राहतील. सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) यांना प्रशासकीय मंजूरी देण्याचे अधिकार संबंधित प्रशासकीय विभागांचे राहतील.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१६०११३११२६००२४२८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Hemant Sudhakar Dange

Digitally signed by Hemant Sudhakar Dange
DN: CN = Hemant Sudhakar Dange, C = IN, S = Maharashtra, O = Government Of Maharashtra, OU = Section Officer
Date: 2016.01.13 16:01:59 +05'30'

हेमंत डांगे
कार्यासन अधिकारी,महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा.मुख्यमंत्री, यांचे प्रधान सचिव,मंत्रालय,मुंबई.

२. मा. मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता यांचे खासगी सचिव,मंत्रालय,मुंबई.

३. मा.विधानमंडळ सदस्य (सर्व)
४. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन यांचे सचिव,मंत्रालय,मुंबई.
५. प्रधान सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई
६. प्रधान सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई
७. सचिव, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
८. महासंचालक, माहिती व जनसंपर्क महा संचालनालय, मुंबई
९. महासंचालक, आरोग्य महासंचालनालय, मुंबई
१०. विभागीय आयुक्त ,सर्व.
११. सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई.
१२. संचालक,भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा,पुणे
१३. जिल्हाधिकारी (सर्व)
१४. संचालक, पाणी व स्वच्छता सहाय्य संस्था, वासो (WSSO)
१५. संचालनालय, नगरपालिका प्रशासन, वरळी, मुंबई
१६. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)
१७. प्रकल्प व्यवस्थापक, जलस्वराज्य-II, सुधारणा सहाय्य व प्रकल्प व्यवस्थापन कक्ष (RSPMU),बेलापुर, नवी मुंबई
१८. उपायुक्त (विकास) (सर्व) विभागीय आयुक्त कार्यालय
१९. कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा, जिल्हा परिषद (सर्व)
२०. उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पाणी व स्वच्छता), जिल्हा परिषद (सर्व)
२१. सर्व कार्यासने, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग
२२. निवड नस्ती (पापु-०८)